पुढारी सिंधुदुर्ग मंगळवार, ३ जानेवारी २०२३

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयाचे शिरंगे येथे श्रमसंस्कार शिबिर

**दोडामार्ग :** जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा शिरंगे येथे हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन ठाकरे गट शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव धुरी यांच्या हस्ते करण्यात आले.पत्रकार संदीप देसाई, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत,शिरंगे सरपंच सरस्वती नाईक, उपसरपंच लवू गवस, ग्रा. पं. सदस्य प्रदीप नाईक, भिकाजी कदम, सिताराम गवस, दीक्षा गवस, वैशाली घाडी, ग्रामसेविका सुजाता जगताप उपस्थित होत्या. प्रा. प्रीती प्रसादी यांनी आभार मानले.